**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – सौरभ बाळासाहेब फुलकर,

वय – २२ वर्षे, व्यवसाय– हॉटेल,

राहणार – नेवासा बु., ता. नेवासा जि. अहिल्यानगर.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. के. साबळे यांचे मार्फत सुरू–**

१. माझे नेवासा बु. येथे नाथबाबा चौक येथे श्रध्दा या नावाने हॉटेल आहे. घटना साधारण तीन वर्षांपुर्वी चौकात घडली. त्यावेळी मी तेथे नव्हतो. घटनेबाबत मला काहीही माहिती नाही. पोलीसांनी माझा जबाब घेतला नव्हता. असे काही घडले नाही की, त्यादिवशी मी चौकात असतांना लक्ष्मण माळी हा त्याची मोटारसायकल क्र. एम.एच.१७ ए.बी. ६३६३ यावरून जात असतांना आरोपीने त्याच्या ताब्यातील टेम्पो क्र. एम.एच. १७ बी.वाय. ६५८२ याने माळी याच्या मोटारसायकलला धडक दिली व तो अपघात मी पाहिला.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली. वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १६.०३.२०२३ रोजी सायंकाळी ०६.१५ च्या सुमारास मी माझ्या हॉटेलमध्ये असतांना लक्ष्मण माळी हा त्याची मोटारसायकल क्र. एम.एच.१७ ए.बी. ६३६३ यावरून नेवासा बु. येथील बाजारतळावरून भाजीपाला घेवून जात होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी नेवासा बु. येथून भरधाव वेगाने टेम्पो आला व आरोपीने तो टेम्पो अचानक उजव्या बाजूला वळवून माळी याच्या मोटारसायकलला धडक दिली, त्यामुळे अपघातामध्ये माळी याच्या उजव्या पायाला गंभीर दुखापत झाली. मला अपघात झाल्याबाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी

हॉटेलमध्ये असतांना माझ्या समक्ष अपघात झाला व ते मी पोलीसांना जबाब देते वेळी सांगितले होते. सदरचा मजकूर माझ्या जबाबामध्ये का लिहिला हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे पोलीसांनी माझ्या जबाबामध्ये लिहिला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला शिक्षा होवू नये म्हणून आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे ॲड. एस. आर. मापारी यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृती,**

**स्वाक्षरीत/-**
**(संध्या यु. सुळ)**
दिनांक-०५/१२/२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२),नेवासा